**खेळांना प्रोत्सहन देण्यासाठी माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय यांना प्रोत्साहन अनुदान देण्याकरिता निधी वितरित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : निविप्र ४०१८/प्र.क्र.१२३/क्रीयुसे -२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : ३० मार्च, २०१९

**वाचा-**

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. राक्रीधो-२०१२/प्र.क्र.२५९/क्रियुसे-१, दि.२६ फेब्रुवारी, २०१४
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र. निविप्र ४०१८ /प्र.क्र १२३/क्रीयुसे-२, दि.१५.०९.२०१८.

**प्रस्तावना –**

संदर्भाधीन क्र.०२ च्या शासन निर्णयान्वये सन २०१८-१९ या वर्षातील जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत प्राविण्यप्राप्त शाळांना प्रोत्साहनात्मक अनुदान देण्यासाठी रु. २०३.०० लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. सुधारीत अंदाजानुसार सदर योजनेसाठी उर्वरीत निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन २०१८-१९ या वर्षाकरीता जिल्हा, राज्य व आंतरराष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धेत प्राविण्य मिळविणाऱ्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना प्रोत्साहन अनुदान देण्यासाठी सुधारीत अंदाजानुसार रु. २३२.०० लक्ष निधी मंजूर असून यापैकी रु.२०३.०० लक्ष संदर्भाधीन शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आला आहे. उर्वरीत रु.२९.०० लक्ष (रुपये एकोणतीस लाख फक्त) तरतूद वितरीत करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च " मागणी क्र.ई -३, २२०४ क्रीडा व युवक सेवा - १०४ क्रीडा व खेळ (२०) माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय व खेळांचे प्रचालन (२०) (०३) खेळांना प्रोत्सहन देण्यासाठी माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना प्रोत्साहन अनुदान (२२०४-५६६२), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात खेळांना प्रोत्सहन देण्यासाठी माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना प्रोत्साहन अनुदान (२२०४-५६६२) या योजनेसाठी वितरीत निधी संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयातील परि.६ मधील बाब क्र. (iii) व (iv) येथिल बाबींवर खर्च करण्यात येऊ नये.

I. उपरोक्त निधी आवश्यकतेनुसार मान्य निकषानुसार खर्च करण्यात यावा. ज्यावेळेस निधी प्रत्यक्ष खर्च करावयाचा त्याच वेळी आंहरीत करावा. शासन लेख्याबाहेर बँक खात्यात हा निधी ठेऊ नये.

II. राज्य शासनामार्फत वेळोवेळी वित्त विषयक निर्गमित करण्यात आलेले विविध आदेश/ नियम/ शासन निर्णय वित्तीय नियमावली यांची अंमलबजावणी करुन वरील वितरीत तरतूदीचा विनियोग करण्याच्या अधीन राहून उपरोक्त तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर योजनेअंतर्गत खेळाडूंना शिष्यवृत्ती मंजूर करतांना मूळ शासन निर्णयामधील तरतूदी लागू राहतील.

४. वित्त विभाग दि.०२.०४.२०१८, दि.२५.०१.२०१९ व इतर अनुषंगीक परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतुद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधीत जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३३०१५३७४६१५२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca2802 67c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.03.30 15:40:45 +05'30'

**( राजेंद्र पवार )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१.मा.राज्यपाल तथा अध्यक्ष, आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजन समिती, मुंबई.
२.मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३.मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
५. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
८. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर

९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत)
११. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१२. लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, (क्रीडा संचालनालयामार्फत)
१३. सर्व उपसंचालक व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत),
१४. वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
१५. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. निवड नस्ती (क्रीयुसे-२).